# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २८४ वा शनिवार दि.२० एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


### मुस्लिम क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष हमीदखा पठाण यांनी पोलीस अधिकाऱ्यांसोबत घेतला ईद-ए-मिलन कार्यक्रम



लातूर:- मुस्लिम क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष हमीदखा पठाण यांनी पोलीस अधिकाऱ्यांसोबत लातूर येथील इस्लामपुरा भागात त्यांच्या स्वतःच्या घरी घेतला ईद-ए-मिलन कार्यक्रम या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी पोलीस उपअधीक्षक (गृह) गजानन भातलवंडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, विवेकानंद पोलीस चौकीचे पो. नि. वैजनाथ मुंडे, लातूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे, वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम , हमीद खान, ड मुश्ताक सौदागर, गौसभाई गोलन, व सर्व सहकारी उपस्थित होते.

# जाती - धर्मापेक्षा देशहित महत्वाचे : क्रीडा मंत्री संजय बनसोडे

## महायुतीचा उमेदवार मताधिक्याने विजयी होणार

उदगीर/प्रतिनिधी : देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ देण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी घेतला आहे. विरोधक जाती - पातीचे राजकारण करत आहेत. पण जाती -धर्मापेक्षा देशहित महत्वाचे आहे. त्यामुळे आपण सर्वांनी जात- धर्म न पाहता देशहिताचा विचार करावा आणि त्यासाठीच भाजपा महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांना मतदान करुन विजयी करावे, असे आवाहन क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी केले. उदगीर तालुक्यातील विविध गावांत महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ सरपंच, उपसरपंच, चेअरमन व महायुतीच्या प्रमुख पदाधिकार्यांच्या बैठकीत ना. बनसोडे बोलत होते. यावेळी माजी आ. गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, विधानसभा अध्यक्ष प्रवीण भोळे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, प्रा.डॉ.श्याम डावळे, माजी नगरसेवक फय्याज शेख, अनिल मुदाळे, इम्तियाज शेख, ब्रम्हाजी केंद्रे, संगम आष्टुरे, नागेश थोंटे आदीसह मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ना. संजय बनसोडे म्हणाले की, मतदार संघातील जिल्हा परिषद सर्कलनुसार बैठका घेणार असुन त्याच अनुषंगाने



हाळी - हंडरगुळीत पहिली बैठक घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील प्रत्येक घटकापर्यंत विविध योजना पोहचविल्या. मागील १० वर्षाच्या काळात सर्वसामान्य घटकांचा विकास अतिशय वेगाने झाला. नरेंद्र मोदी यांचे देशाला विकसित करण्याचे स्वप्न असुन आपण सर्वांनी साथ दिली तर ते निश्चितच पूर्णात्वास जाईल असा विश्वास आहे. आपण सर्वांनी एकत्र येवून नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीचे उमेदवार सुधाकर श्रृंगारे यांनाच मतदान करावे, असे आवाहन ना. बनसोडे यांनी केले. याप्रसंगी माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, वसंत पाटील, गणेश गायकवाड, इब्राहिम देवर्जनकर, उदय ठाकुर, बालाजी देमगुंडे, प्रभाकर पाटील, रामकिशन जाधव, देविदास गुरमे, विकास मुसणे, संजीव केंद्रे, अजय गौशटवार, ज्ञानेश्वर भांगे, शुभम केंद्रे, धोंडीबा डावळे, दामोदर पाटील, लक्ष्मण डावळे, प्रभाकर डावळे, दिगंबर कुंडगीर, हणमंतराव डावळे, पंढरी पाटील, विश्वनाथ पाटील, दिगंबर पाटील, तानाजी डावळे, रामदास सुळे, रऊफ शेख, लक्ष्मण पाटील, संजीव हुंजे, बापूराव सुरवसे, बालाजी गायकवाड, धनाजी डावळे, नवनाथ मालवणे, शिवाजी माने, सुनिल कांवडे, माधव वडारे, संभाजी भालमारे, अमिर पठाण, आदीसह डाऊळ, हिप्परगा, खेर्डा, गुर्ती, वाढवणा, देऊळवाडी, घोणसी, हकनकवाडी, एकुर्का, इस्मालपुर, कल्लुर, गुडसुर, बोरगाव, वाढवणा खु., हंडरगुळी, नावंदी आदी भागातील प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट गोकुंदा परिसरात मृत जनावराच्या उग्र वासासह धुळीने नागरिक हैराण



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) गेल्या अनेक दिवसांपासून किनवट गोकुंदा परिसर भागात कोणत्याही रस्त्याने गेल्यास तिथे गाढव कुत्रा घोडा असे मृत प्राणी मरून कुजल्याने दुर्गंधीयुक्त वासाने नागरीक प्रचंड हैराण झाले आहेत. अनेक वर्षापासून धुळीने होणाऱ्या त्रासात आता या उन्हाच्या कडाक्यामुळे जनावरे मृत होण्याचे प्रमाण वाढले असून. त्यामुळे दुर्गंधीयुक्त वासात अधिक भर पडल्याने सकाळी मॉर्निंग वॉकला जाणारे किंवा रोडवर येनार जानार रणारे नागरिक हैराण झाल्याचे बघायला मिळत आहे. दवसभर घरात कोंडून घेणे अथवा तोडाला रूमाल लावून घराबाहेर पडण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. तसेच नागरिकांना मळमळ उलट्यांचा त्रास जाणवू लागला आहे. त्याम ळे या भागात यावर उपाययोजना करणारी यंत्रणा आहे का? अशी शंका नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. गेल्या अनेक म हिन्यापासून मृत जनावरांचा तसेच रोडवरील धुळीमुळे नागरिक हैराण झालेले बघायला मिळत आहेत. कमी अधिक प्रमाणात नागरी वस्ती जवळ वासाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांना घराचे खिडक्या दरवाजे बंद करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. तर रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना तोंडाला रूमाल बांधून प्रवास करावा लागत आहे. नगरपालिका व ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये मृत जनावराची विल्हेवाट न लावता त्यांच्या प्रेताला बेवारस फेकून दिल्यामुळे व घनकचऱ्याचे योग्य विल्हेवाट न लावल्याम ळे या दुर्गंधीमुळे भर पडत आहे. यामध्ये बळीराम पाटील कॉलेज परिसर, मंगाबोडी रोड, किनवट घोटी रोड यासह परिसरातील सर्वच भागात मृत जनावराच्या उग्र तीव्र वासाने वायूचे प्रदूषण होऊन नागरिकाचे आरोग्य धोक्यात येत आहे. यावर संबंधित विभागाने त्वरित दखल घेऊन नागरिकांना या दुर्गंधीतून मुक्त करावे अशी मागणी होत आहे.

### माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते निलंगा तालुका काँग्रेस कमिटीकडून उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचार कार्यालयाचा शुभारंभ



लातुर / प्रतिनिधी:- लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ निलंगा या ठिकाणी प्रचार कार्यालय सुरू करण्यात आले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातुरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते या प्रचार कार्यालयाचा शुभारंभ फीत कापून करण्यात आला. यावेळी अशोकराव पाटील निलंगेकर, डॉ.शिवाजी काळगे, अजित माने, डॉ. अरविंद भाताब्रे, पंकज शेळके, अविनाश रेशमे, आबासाहेब पाटील, दयानंद चोपणे, अजित नाईकवाडे यांच्यासह निलंगा तालुका काँग्रेस कमिटी पदाधिकारी, सदस्य उपस्थित

## मोदी सरकारच्या कार्यकाळात देशात गरीब कल्याणाचे काम : अरविंद पाटील निलंगेकर



शिरुर अनंतपाळ/प्रतिनिधी : मागील दहा वर्षांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात गरीबांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. यातून गरिबी हटविण्यासाठी केंद्र सरकारची कटिबध्दता दिसून आल्याचे मत युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केले. लातूर लोकसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवारगट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, रिपाई (आठवले), रासप, रयत क्रांतीसह महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ शिरुर अनंतपाळ तालुक्यात विविध ठिकाणी आयोजित मेळाव्यात मार्गदर्शन करताना निलंगेकर बोलत होते. यावेळी उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, पंडितराव धुमाळ, ॲड. संभाजीराव पाटील, शिवसेना शिंदे गट जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, रिपाइं आठवले गट जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, रासप जिल्हाध्यक्ष नागनाथ बोडके, मनसे जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाने, माजी जि. प. अध्यक्ष राहुल केंद्रे, राष्ट्रवादी काँग्रेसचे व्यंकट बेद्रे, भारत चामे, भाजपा तालुकाध्यक्ष मंगेश पाटील कुमोद लोभे, विठ्ठल पाटील, विकास शिंदे, शिवाजी पेठे, मधुकर कांबळे, शिवाजी हजारे शेषराव ममाळे, दगडू सोळुंके आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना अरविंद पाटील म्हणाले की, खा. सुधाकर श्रृंगारे यांनी गेल्या पाच वर्षात या मतदारसंघातील कोणाचेही मन दुखावले नाही. त्यामुळे या मतदारसंघातून ७५ हजारांचे मताधिक्य मिळाले पाहिजे. सर्व पक्षाचा समन्वय प्रत्येक घरापर्यंत दिसला पाहिजे. पंतप्रधान मोदी संसदेत जाताना नतमस्तक झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गरीब कल्याणाच्या ९६ योजना राबवल्या. आपला देश सर्वच बाबतीत सुरक्षित आहे. दिशा व विश्वास देणारा नेता मोदीजी आहेत. आज विकसित भारतासाठी मोदीजी प्रयत्न करीत आहेत. आ. संभाजी पाटील पालकमंत्री असताना लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्याला समान निधी दिला.भाजपने जिल्हा परिषदेच्या माध्यमातून महिला, समाजकल्याण, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रात सामान्य माणसाला केंद्रबिंदू म्हणून काम केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना ना. बनसोडे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला घटना दिली. बाबासाहेबांचे संसदेत तैलचित्र लावण्यासाठी काँग्रेसला तब्बल पन्नास वर्षे लागली. काँग्रेस आज अपप्रचार करत आहे. घटना बदलणार हे खोटे सांगत आहे. या पृथ्वीतलावर चंद्र सूर्य असेपर्यंत बाबासाहेबांची घटना कोणी बदलणार नाही,असेही त्यांनी सांगितले.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची निलंगा येथील माजी नगराध्यक्ष हमीद शेख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ संवाद बैठक संपन्न

लातुर / प्रतिनिधी :- लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ गुरुवार दि १८ एप्रिल रोजीसायंकाळी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातुरचे पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये निलंगा येथील माजी नगराध्यक्ष हमीद शेख यांच्या निवासस्थानी संवाद बैठक पार पडली. या संवाद बैठकीस उपस्थित नागरीक व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यात लोकसभा निवडणूक अनुषंगाने विविध चर्चा झाली. यावेळी सर्वांनी डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, आज आपण लातुर लोकसभा निवडणूक अनुषंगाने या ठिकाणी संवाद बैठकीच्या निमित्ताने एकत्र आलेलो आहोत. देशातील जी परिस्थिती आहे ही परिस्थिती आपल्याला बदलायची आहे आणि यासाठीच यावेळची निवडणूक मतदारांनी आपल्या हातात घेतली असून देशातील हुकूमशाही सरकार बदलण्याची ही वेळ आहे. आज एकही प्रवर्ग असा नाही की जो या सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे त्रस्त नाही. मागील ७० वर्षात कधीही शेतकऱ्यांना आपल्या हक्कासाठी दिल्लीत जाण्याची वेळ आली नाही, पण या सरकारने शेतकऱ्यांना आपल्या न्याय शेतमाल बाजारभावासाठी दिलीत आंदोलन करावे लागत आहे, आणि सरकार त्यांचे प्रश्न सोडवण्याऐवजी त्यांच्यावर लाठीचार्ज केला जातो हे लज्ञास्पद आहे. जसे देशात तसे राज्यात सुरू आहे आज एकाचा पक्ष दुसऱ्याला दिला जात आहे, इकडचे आमदार खासदार तिकडे जात आहेत आणि या केवळ सत्तेसाठी सुरू आसलेला खेळ जनता उघड्या डोळ्यांनी पाहत असून जनतेत या सरकार बद्दल तीव्र असंतोष असून





हा असंतोष मतदानातून व्यक्त करेल यात शंका नाही. आपण देखील या संधीचे सोने करावे व आपल्या हक्काचा माणूस, उच्च शिक्षित, आपल्या मातीतील भूमिपुत्र डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करून आपल्या लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी संसदेत पाठवावे ते आपल्यासाठी २४ तास ३६५ दिवस ५ वर्ष आपल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपल्या सेवेत राहतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी बोलताना डॉ शिवाजी काळगे म्हणाले की, लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचा उमेदवार म्हणून मी आपल्या समोर आहे. विद्यमान सरकारने मागिल १० वर्षात ईडी, सीबीआयच्या दबाव टाकून पक्ष बदलण्यास भाग पडणे, महागाई वाढविणे, लोकशाही विरोधात काम करणे, इंधन दरवाढ, सोयाबीनचे भाव वाढविण्याऐवजी कमी करणे, विद्यार्थी, युवकांचे प्रश्न सोडविले जात नाहीत, महिला अत्याचार रोखणे आवश्यक आहे, आणि यासाठी आपण आपला आशीर्वाद या निवडणुकीत द्यावा व सद्याची परिस्थिती बदलण्याची संधी मिळावी अशी विनंती केली. यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रशीद शेख म्हणाले की, देश घडविण्यासाठी एक मताचा अधिकार आपल्याला व एक मताचा अधिकार राष्ट्रपती महोदयाना या देशाच्या घटनेने दिला आहे. आपल्याला सध्या संकटात सापडत असलेले संविधान वाचविण्यासाठी व आपल्या पुढच्या पिढीसाठीची ही लोकसभा निवडणूक असून आपण या निवडणुकीत हुकूमशाही ऐवजी लोकशाहीच्या बाजूने उभे राहावे आणि डॉ. शिवाजी काळगे याना निवडून द्यावे अशी विनंती उपस्थित सर्वाना केली. यावेळी बोलताना डॉ मौलाना म्हणाले की, आपला भारत देश आणि देशाची परंपरा ही सर्वधर्म समभावाची असून संसदेत बोलतानाची पद्धत चुकत आहे. पूर्वीच्या प्रमाणे आदर सद्या संसदेत दिसून येत नाही आणि ही पध्दत बदलून आपल्याला पूर्वीप्रमाणे आपला भारत देश करायचा आहे यासाठी आपण सर्वांनी डॉ. शिवाजीकाळगे याना विजयी करावे अशी विनंती केले. यावेळी बोलताना मौलाना मुफ्तीसाब म्हणाले की, लातुर लोकसभा मतदार संघातील उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या पाठीशी जमायत ए उलेमा खंबीरपणे उभी असून आपण संसदेत जावे ही आमची अपेक्षा असून आम्हाला भारताचे संविधान वाचवायचे आहे यासाठी आम्ही आपल्या सोबत असून आपण बहुमताने निवडून याल याचा विश्वास दिला. यावेळी अशोक पाटील निलंगेकर, निरीक्षक संतोष देशमुख, अभय साळुंके, विजयकुमार पाटील, आबासाहेब पाटील, दयानंद चोपणे, अजित माने, तय्यब बागवान, नजीर बागवान, महमूद आतार, रफिक आतार, माजीद पटेल, फारूक सय्यद, नाना पटेल, कलिम सौदागर, मौलाना नसरुद्दीन साब, रोहित सुर्यवंशी, सय्यद कादरी, अय्युब बागवान, नजीर बागवान, अविनाश रेशमे, अजित माने, डॉ अरविंद भाताब्रे यांच्यासह मराठा सेवा संघ सदस्य, निलंगा शहरातील मुस्लिम समाज बांधव, कुरेशी बिरादरी, बागवान बिरादरी, महिला भगिनी, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय....

# सुनो द्रौपदी, शस्त्र उठा लो..

आजपासून मतदान सुरू होत असलेल्या यंदाच्या या निवडणुकीचा मुद्दा काय, असा प्रश्न सर्वसामान्य, किमान विचारी जनांस पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.आव्हान काळातील वर्तनातून व्यक्तीचा खरा स्वभाव दिसून येतो असे म्हणतात. सद्य:स्थितीत निवडणुका हे एक आव्हान. तेव्हा त्यास सामोरे जाणाऱ्या व्यक्तींचे वर्तन पाहिल्यास त्या सर्वांचे अंतरंग, त्यांचा स्वभाव आदींचे 'खरे' दर्शन घडते असे म्हणता येईल. या आव्हानवीरांतील कोणी महिला प्रतिस्पर्ध्याविषयी अत्यंत अनुदार उद्गार काढतो. कोणी स्वपक्षीय पुरुष नेत्याचे कोणा महिलेशी कसे संबंध आहेत याच्या सर्वसामान्यांस काहीही देणेघेणे नसलेल्या मुद्दयांवर बोलतो. एखादा आपला प्रतिस्पर्धी वर्षांच्या कोणत्या कालात शाकाहार/मांसाहार भक्षण करतो यावर टीका करतो. शिक्षणनगरीतील कोणी विद्वान आपल्या आव्हानवीराच्या शैक्षणिक कारकीर्दीविषयी स्वत: जणू आईन्स्टाईन असल्यागत टीका करतो. कोणी कोणास बांगडया पाठवण्याचे कालबाह्य, अत्यंत प्रतिगामी असे रूपक उदाहरणार्थ वापरतो तर अन्य कोणास मुलींचा घटता जन्मदर पाहून भविष्यात अनेकींस पांचाली व्हावे लागेल अशी चिंता वाटते. 'लोकशाहीची जननी' वगैरे असलेल्या या देशातील 'सर्वात मोठया उत्सवात' सहभागी होणाऱ्यांचे शब्दप्रयोगही पाहा. 'युद्ध', 'दाणादाण', 'साफ करून टाकणे', 'धडा शिकवणे', 'अद्दल घडवणे' इत्यादी. यातील ताजी भर म्हणजे मतदान यंत्रांची बटणे कचाकचा दाबा, हा सल्ला. याच नव्हे तर कोणत्याही यंत्राची बटणे दाबण्याची क्रिया ही पटापटा, भराभरा, झपाझप अशी होऊ शकते. कचाकचा हा शब्दप्रयोग भांडणे (सार्वजनिक नळावरची) वा क्रूर, असभ्य, अशिष्ट पद्धतीने चावे घेणे इत्यादी क्रियांशी निगडित आहे असे मराठीचे किमान ज्ञान असलेल्यांस वाटेल. आता ते विसरून बटणे दाबण्याची क्रिया कचाकचा करणे आपणास शिकावे लागणार.हे सर्व पाहिल्यावर या निवडणुकीचा नक्की मुद्दा काय, असा प्रश्न सर्वसामान्य, किमान विचारी जनांस पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा सामान्य माणूस चलनवाढीने होरपळलेला आहे आणि पर्यावरणीय होरपळीला कावलेला आहे. यातील दुसऱ्यासाठी सरकार थेट काही करू शकत नाही याची जाण या विचारी जनांस नक्कीच आहे. पण आताच्या नव्हे तर पुढच्या पिढीसाठी तरी पर्यावरण रक्षणाच्या मुद्दयावर कोण काय करू पाहतो याची चर्चा या निवडणुकांत होताना दिसत नाही. आज विकसित देशांतील निवडणुकांत पर्यावरण हा राजकीय पक्षांच्या कार्यक्रमावरील पहिला मुद्दा असतो. या मुद्दयाचे आपल्याकडील अस्तित्व पाहता विकसितपणाच्या दर्जापासून आपण अद्यापही किती दूर आहोत हे लक्षात यावे. पर्यावरण रक्षण निवडणूक कार्यक्रमात येणे हे फारच झाले. पण निदान चलनवाढ हा मुद्दा चर्चेत असावा, तर तेही नाही. आज भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो आणि हा 'लोकशाहीचा लाभांश' सुरुवातीस अनेकदा साजराही केला गेला. अलीकडच्या काळात हा शब्दप्रयोग कानावर पडत नाही, हे खरे. पण म्हणून तरुणांसमोरील समस्या मिटल्या आहेत असे नाही. अमेरिकेत दर आठवडयात किती रोजगार निर्माण झाले, त्याची अधिकृत आकडेवारी प्रसृत होते आणि हे रोजगार निर्मितीचे प्रमाण घसरले म्हणून आकडेवारी जाहीरच करायची नाही, असे तिकडे होत नाही. या धर्तीवर आपल्याकडेही आठवडयाची जमत नसेल तर नाही, पण महिन्याची/दोन महिन्याची रोजगार निर्मिती किती याचा काही तपशील जाहीर व्हायला हवा, ही अपेक्षा चुकीची नाही. नंदन निलेकणी यांच्या बुद्धिमान कल्पनेतून आकारास आलेला 'आधार क्रमांक' हा आपल्या देशात अपरिहार्य आहे. हा आधार क्रमांक, खासगी/सरकारी संस्थांकडील कर्मचारी तपशील इत्यादी माहिती या 'डिजिटल इंडिया'त नियमितपणे प्रसिद्ध करता येणे अवघड नाही. अर्थात कोणतीही माहिती जाहीर करायचीच नाही, असा काही निर्णय असल्यास गोष्ट वेगळी ! पण तसे काही ठरवले असेल यावर विश्वास का ठेवावा ? सरकार म्हणते त्या प्रमाणे आपली आर्थिक प्रगती निश्चितच होत असणार. आणि जेव्हा आर्थिक प्रगती होत असते तेव्हा रोजगार निर्मितीचा वेगही वाढलेला असतो. त्यामुळे तो आपल्याकडेही वाढलेला असणार, असे गृहीत न धरणे अयोग्य. सरकारने तेव्हढी रोजगार निर्मितीची माहिती ठरावीक अंतराने प्रसृत करावी इतकाच काय तो मुद्दा. तसे झाले असते तर विरोधकांच्या प्रचारातील हवाच गेली असती. त्यासाठी तरी अशी माहिती देण्याची गरज सत्ताधीशांस वाटेल.एका बाजूने हे सत्ताधीश अशा सकारात्मक निवडणूक कार्यक्रम निर्मितीकडे दुर्लक्ष करत असताना दुसरीकडे विरोधकही तितकेच चाचपडताना दिसतात. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात राणा भीमदेवी गर्जना करून विरोधकांची 'इंडिया' आघाडी जन्माला तर आली. पण अजूनही ती उठून चालू लागलेली आहे, असे म्हणावे अशी स्थिती नाही. अनेक ठिकाणी उमेदवारच नाहीत, सापडले असले तर त्याबाबत विरोधकांची एकवाक्यता नाही. सापडले नसले तर ते शोधायचे कोणी यावर मतभेद. ते मिटणार कधी आणि एकवाक्यता येणार कधी हा प्रश्न ! तो पडतो याचे कारण आज निवडणुकीच्या पहिल्या फेरीचे मतदान होत असताना या विरोधी 'इंडिया' आघाडीची एकही संयुक्त सभा नाही. निदान महाराष्ट्रात तरी या एकीचे दर्शन राज्यातील जनतेस अद्याप झालेले नाही. ही एकत्र सभा भले जमली नसेल. पण निदान किमान समान कार्यक्रम तरी या विरोधकांनी द्यावा ! पण तेही झालेले नाही. तरीही विरोधक एकत्र आहेत असे जनतेने मात्र मानावे आणि त्यानुसार मतदान करावे, अशी या आघाडीच्या नेत्यांची इच्छा. ती पूर्ण करायची मतदारांची इच्छा असली तरी त्या इच्छेस काही आधार तर हवा ! तेव्हा या अशा मुद्देशून्य निवडणुकांत भरीव काही धसास लागण्याऐवजी परस्परांतील बेजबाबदारपणालाच बहर येणार, हे उघड आहे. शिवसेनेचे संजय राऊत आणि राष्ट्रवादीचे अजितदादा पवार यांची ताजी वक्तव्ये ही त्याची निदर्शक. हे उल्लेख केवळ प्रतीकात्मक. राऊत यांचे विधान सत्ताधारी पक्षाच्या एका महिला उमेदवारास उद्देशून होते तर अजितदादांचे लक्ष्य मात्र असे कोणी एक नव्हते.

# ईशान्य भारतातील राजकीय रंग

ईशान्येकडील राज्यांत लोकसभेच्या एकूण २५ जागा आहेत. आसाममध्ये लोकसभेच्या सर्वाधिक १४ जागा आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला २५ पैकी २१ जागा मिळाल्या होत्या. यावेळी भाजपला मागील आकडा पार करायचा आहे. आतापर्यंत, इंडिया आघाडीने ईशान्येकडील राज्यांमध्ये त्यांचा कोणताही मोठा हिस्सा असल्याचे संकेत दिलेले नाहीत. ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या निवडणुकीत येथे काहीतरी करण्याचा वेगळा प्रयत्न केला होता, पण यावेळी तो प्रयत्नही कुठे दिसत नाही. मणिपूरमध्ये लोकसभेच्या केवळ २ जागा असल्या तरी तेथील आदिवासी संघर्ष संपवणे मोदी सरकारसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण मणिपूर हिंसाचार हा सध्या राष्ट्रीय मुद्दा राहिला आहे.जिथे सूर्याची किरणे सर्वांत आधी पोहोचतात, तो ईशान्य भारत लोकसभा निवडणुकीत आपला निकाल देण्यासाठी सज्ज झाला आहे. भारतीय जनता पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीत ३७० जागा जिंकण्याचे लक्ष्य घेऊन पुढे जात आहे. त्यामुळे ईशान्येकडील २५ जागाही भाजपसाठी महत्त्वाच्या आहेत. लोकसभा निवडणुकीसाठी ईशान्येकडील राज्यांमध्ये १९ एप्रिल, २६ एप्रिल आणि ७ मे रोजी मतदान होणार आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकांचा विचार करता भारतीय जनता पक्षाने ईशान्येत उभारलेला झेंडा यावेळीही आपल्या हाती ठेवण्याचा पक्षाला विश्वास आहे. या आत्मविश्वासामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास आहे की त्यांनी ईशान्येकडील विकासाच्या योजना ज्या पद्धतीने राबवल्या, तेथील जनता त्यांचा पक्ष आणि सरकार कधीही विसरणार नाही. यातील दुसरा एक पैलू म्हणजे पंतप्रधान मोदींप्रमाणेच गृहमंत्री अमित शहा यांनीही विविध शांतता करारांतर्गत संपूर्ण ईशान्य भारतात कायमस्वरूपी शांततेचे वातावरण निर्माण केले आहे. कडक अंतर्गत सुरक्षेमुळे संपूर्ण ईशान्येकडील भागात कोणतीही मोठी हिंसक घटना घडलेली नाही. मणिपूर याला अपवाद आहे आणि तेथेही गृहमंत्रालय ठोस तोडगा काढण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.ईशान्येकडील राज्यात लोकसभेच्या एकूण २५ जागा आहेत. आसाममध्ये लोकसभेच्या सर्वाधिक १४ जागा आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला २५ पैकी २१ जागा मिळाल्या होत्या. यावेळी भाजपला मागील आकडा पार करायचा आहे. आतापर्यंत, इंडिया आघाडीने ईशान्येकडील राज्यांमध्ये त्यांचा कोणताही मोठा हिस्सा असल्याचे संकेत दिलेले नाहीत. ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या निवडणुकीत येथे काहीतरी करण्याचा वेगळा प्रयत्न केला होता, पण यावेळी तो प्रयत्नही कुठे दिसत नाही. याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे खुद्द शरद पवार आपल्या पुतण्यासोबत त्यांच्या पक्षासाठी आणि अस्तित्वासाठी लढत आहेत, तर ममता बॅनर्जी स्वत:च्या घरातील भ्रष्टाचाराने घेरल्या आहेत आणि जातीयवाद्यांना संरक्षण देत आहेत. ईशान्येकडील जनतेचे भाजपवर विश्वास ठेवण्याचे कारण म्हणजे गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी विकास आणि शांतता निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर सक्रिय लक्ष केंद्रित केले आहे.मणिपूरमध्ये लोकसभेच्या केवळ २ जागा असल्या तरी तेथील आदिवासी संघर्ष संपवणे मोदी सरकारसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण मणिपूर हिंसाचार हा सध्या राष्ट्रीय मुद्दा राहिला आहे. यासाठी गृहमंत्री अमित शहा सातत्याने प्रयत्न करत आहेत. अलीकडे, एका ऐतिहासिक घडामोडीत, भारत सरकार आणि मणिपूर सरकारने मणिपूरचा सर्वांत जुना सशस्त्र गट, युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंटसह शांतता करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारामुळे ईशान्येत सर्वसाधारणपणे आणि विशेषत: मणिपूरमध्ये शांततेचे नवीन पर्व सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. घाटी–आधारित मणिपुरी सशस्त्र गटाने हिंसाचार सोडून मुख्य प्रवाहात परत येण्याची आणि भारतीय राज्यघटना आणि देशाच्या कायद्यांचा आदर करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या करारामुळे गेल्या अर्ध्या शतकात हजारो लोकांचा बळी घेणा–या आणि सुरक्षा दलांमधील शत्रुत्व तर संपेलच, शिवाय समाजाच्या दीर्घकालीन चिंतेचे निराकरण करण्याची संधीही मिळेल. मणिपुरी सशस्त्र गट १९६४ पासून सक्रिय होते. भारतीय हद्दीत आणि बाहेर अशा दोन्ही ठिकाणी ऑपरेशन करत होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी ईशान्येत कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या



पहिल्या कार्यकाळापासूनच सक्रिय आहेत. गृहमंत्री अमित शहा यांच्या मते, पूर्वीच्या काँग्रेस सरकारांची धोरणे समस्यांवरून लक्ष हटवून सत्ता उपभोगण्याची होती. त्यामुळे परिसरातील हजारो लोकांचा मृत्यू झाला. मोदी सरकारने या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी केवळ पुढाकार घेतला नाही, तर अतिरेकी गटांना हिंसाचाराच्या मार्गापासून दूर ठेवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. गेल्या ४० वर्षांत प्रथमच, आसाममधील सशस्त्र दहशतवादी संघटना उल्फाने भारत आणि आसाम सरकारसोबत त्रिपक्षीय शांतता करार कायम ठेवला आहे. मोदी सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात ईशान्येकडील हिंसाचाराचे गडद युग संपवण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला. मोदी सरकारच्या आगमनानंतर, आसाममधील सर्वांत जुनी अतिरेकी संघटना उल्फाने हिंसाचार सोडण्यास, संघटना विसर्जित करण्यास आणि लोकशाही प्रक्रियेत सामील होण्यास पूर्णपणे सहमती दर्शविली. दहशतवादी हे दिशाभूल करणारे लोक असल्याचे अमित शहा सांगत आहेत.त्यांना रोजगाराच्या संधी आणि सुरक्षितता उपलब्ध करून दिल्यास आणि नव्या भारताचे चित्र दाखविल्यास ते हिंसाचाराचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी पुढे येतील. उल्फा कार्यकर्त्यांचे आत्मसमर्पण याच विश्वासाचे फलित आहे. ईशान्येकडील ९००० हून अधिक बंडखोर कार्यकर्त्यांनी आत्मसमर्पण केले हे शहा यांच्या धोरणांचे यश आहे. दळणवळणाच्या सुविधांचा अभाव हे ईशान्येकडील राज्यांमध्ये लोकांच्या समस्यांचे प्रमुख कारण होते. मोदी सरकारने यावर मोठा पुढाकार घेतला. त्यांनी ५ कनेक्टिव्हिटीसह संपूर्ण देशाला ईशान्येतील दुर्गम भागांना जोडण्यास सुरुवात केली. मोबाईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी गावांमध्ये शेकडो टॉवर बसवण्यात आले. ईशान्येचे मोक्याचे स्थान लक्षात घेऊन मोदी सरकार आर्थिक संबंधांसाठी पूर्वेकडील प्रवेशद्वार म्हणून या प्रदेशाचा विकास करत आहे. येथील लोकांच्या आकांक्षाही भारताच्या विकासात भर घालत आहेत. सध्या, ईशान्येकडील पायाभूत सुविधा कनेक्टिव्हिटीमध्ये प्रचंड काम केले जात आहे.

गेल्या १० वर्षांत ईशान्येत प्रथमच अनेक गोष्टी घडल्या आहेत. ईशान्येकडील अनेक भाग प्रथमच रेल्वे सेवेशी जोडले जात आहेत. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर मेघालय भारताच्या रेल्वे नेटवर्कवर आले. नागालँडला आता १०० वर्षांनंतर दुसरे रेल्वे स्थानक मिळाले आहे. पहिली मालगाडी मणिपूरच्या रेल्वे स्थानकावर पोहोचली. सिक्कीमला पहिले विमानतळ मिळाले. मणिपूरमधील जातीय हिंसाचारावरून विरोधक मोदी सरकारवर जोरदार टीका करत आहेत. तर केंद्र सरकार हिंसाचाराला जबाबदार असणा–यांवर कडक कारवाई करत आहे. जेव्हा संघर्ष शिगेला पोहोचला होता, तेव्हा गृहमंत्री अमित शहा स्वत: तिथे गेले होते. तणाव संपवण्यासाठी त्यांनी विविध संबंधितांच्या अनेक बैठका घेतल्या.मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यात ते यशस्वी होतील, अशी मोदी आणि अमित शहा यांच्याकडूनही अपेक्षा आहे. मोदी सरकारने ईशान्येकडील लोकांच्या दारापर्यंत प्रशासन नेण्याचे वचन दिले आहे. ईशान्य खूप दूर आहे हा समज त्यांनी बदलला आहे. मोदी आणि अमित शहा यांच्या जोडीने ईशान्येला दिल्लीच्या अगदी जवळ आणले आहे. येथे गुंतवणूक पूर्वीपेक्षा चौपट आहे. अलीकडेच पंतप्रधान मोदींनी अरुणाचलमध्ये १३,००० फूट उंचीवर बांधलेल्या सेला बोगद्याचे उद्घाटन केले आणि चीनला आपल्या इराद्याबद्दल माहिती दिली. देशातील पहिले क्रीडा विद्यापीठ मणिपूरमध्ये स्थापन करण्यात आले आहे. ८ राज्यांमध्ये २०० हून अधिक खेलो इंडिया केंद्रे बांधली जात आहेत. केंद्र सरकारने केलेल्या या भगीरथ प्रयत्नांना ईशान्य भारतीय जनता कसा कौल देते हे पाहणे रंजक ठरणार आहे.

# विद्युतवाहन क्रांतीच्या दिशेने

भारतामध्ये विद्युत वाहनांकडे (ईव्ही) नागरिकांचा असणारा ओढा वेगाने वाढत आहे. २०२५ पर्यंत सहा टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात ईव्हीचा बाजारात हिस्सा वाढेल, अशी अपेक्षा आहे. ईव्ही उद्योग विकसित होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत. यामध्ये अंशदान आणि पायाभूत सुविधांच्या विकासाच्या माध्यमातून सरकारचे पाठबळ महत्त्वाचे आहे. येणा–या काळात या पाठबळाशिवाय परकी गुंतवणूक आणि तंत्रज्ञान सहकार्य यास आकर्षित करणे, प्रामुख्याने बॅटरीनिर्मितीच्या दृष्टीने कार्य करताना देशांतर्गत ईव्हीसाठी सक्षम व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.२०२४ हे जगात इलेक्ट्रिक वाहनांत (ईव्ही) क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज झाले आहे. पर्यावरणाबाबत व्यक्त केली जाणारी चिंता कमी करण्यासाठी आणि कडक नियमावलीत तसेच आधुनिक तंत्रज्ञानाने विकसित होणा–या ईव्ही वाहनांच्या विक्रीत लक्षणीय वाढ होत आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर वाहतुकीचे चित्र बदलत आहे. या बदलात सर्वांत पुढे चीन आहे. या देशाने धोरणात्मक पातळीवर स्वत:ला ईव्हीच्या उद्योगात एक निर्विवाद नेतृत्व म्हणून सिद्ध केले आहे. चीनचे वर्चस्व हे अनेक कारणांतून निर्माण झाले आहे. उदारमतवादी अंशदान धोरण आणि आक्रमक उत्पादन ध्येय यासारख्या धोरणामुळे चीनने सक्रियपणे देशांतर्गत ईव्ही बाजाराला चालना दिली आहे. ईव्हीतील संशोधन आणि विकास, आकर्षक मूल्य यामुळे ईव्हीच्या आघाडीवर स्पर्धात्मक साखळी निर्माण झाली आहे. ई–वाहन क्षेत्रात दबदबा निर्माण करताना वेळोवेळी विशेष लक्ष दिल्याने हे वाहन चीनच्या लोकसंख्येतील मोठ्या वर्गासाठी सुलभ ठरत आहे. परिणामी चीन हा जागतिक ईव्ही बाजारात मोठा वाटा असल्याचा दावा करत आहे. २०२३ मध्ये नवीन ईव्ही विक्रीत चिनी कंपन्यांचा वाटा ६९ टक्के राहिला आहे. चीनची 'बीवायडी' ही टेस्लाला मागे टाकत जगातील आघाडीची कंपनी बनली आहे. हे वर्चस्व चीनच्या सीमापारही झाले आहे.या क्षेत्रातील मागच्या वर्षीच्या गतीवर स्वार होत चीनच्या वाहननिर्मात्यांनी विकसित होणा–या बाजारावर आपली व्याप्ती वाढविली आहे. तसेच प्रस्थापित कंपन्यांवर ते प्रभाव निर्माण करत आहेत. हा बदल प्रामुख्याने युरोपात अधिक ठळकपणे दिसून येतो. या ठिकाणी ईव्ही बाजारात लोकांच्या बजेटनुसार गाड्या चीनने उपलब्ध करून दिल्या आहेत. चिनी ईव्ही निर्यातीत उल्लेखनीय वाढ नोंदली गेली आहे. बीवायडी आणि एसएआयसी सारख्या कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारावर विशेषत: दक्षिण पूर्व आशिया आणि आखात सहकार्य परिषद (जीसीसी) देशांवर लक्ष ठेवून आहेत. या ठिकाणी चीनचे सक्षम आर्थिक संबंध आणि स्वच्छ ऊर्जा सहकार्य हे गेमचेंजर म्हणून सिद्ध होत आहे. अर्थात चीनचे नेतृत्व देखील अनेक आव्हानांपासून मुक्त नाही. तीव्र वृद्धीने पुरवठा साखळीतील उणिवा समोर आल्या आहेत. लिथियम आणि कोबाल्टसारख्या महत्त्वाच्या सामग्रीतील टंचाईने उत्पादन विस्कळीत होण्याचा धोका आहे. त्याचवेळी बॅटरी रीसायकलिंग आणि त्या स्रोतांसाठी होणा–या उत्खननामुळे पर्यावरणावर होणा–या परिणामाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. शिवाय चिनी ईव्ही निर्मात्यांचे लाभाचे मार्जिन कमी राहू शकते आणि त्यांच्या बाजारातील दीर्घकालीन स्थैर्यात अडथळा येऊ शकतो. यादरम्यान, अमेरिका, युरोप, जपान येथील निर्माते पुढे जाण्यासाठी संघर्ष करत आहेत. पारंपरिक मोटार कंपन्या विद्युतीकरणासाठी मोठी गुंतवणूक करत आहेत. ते स्वत:ला ईव्ही प्लॅटफॉर्म म्हणून सिद्ध करण्यासाठी स्रोत वाढवत आहेत आणि बॅटरी कंपन्यांशी सहकार्य करार करत आहेत. २०२४ मध्ये अमेरिकी निवडणूक ही ईव्ही धोरणासाठी एक युद्धाचे मैदान म्हणून समोर येण्याची शक्यता आहे. यात सरकारचे प्रोत्साहन हे अमेरिकी ईव्ही बाजाराच्या भविष्याला आकार देऊ शकते. युरोपमध्ये उत्सर्जनाबाबत असणारे कडक नियम हे मोटारनिर्मात्यांना चार्जिंगची उत्तम व्यवस्था निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास भाग पाडत आहेत आणि ईव्हीमध्ये रुपांतर करण्यासाठी प्रवृत्त करत आहेत.एकीकडे चीन प्रस्थापित खेळाडूप्रमाणे नव्या खेळाडूंवर वर्चस्व गाजवत असताना अन्य देशांतूनही ईव्ही क्रांतीची लाट उसळत आहे. भारतासारख्या देशात जेथे मध्यमवर्गीयांचे वाढते प्रमाण आणि वाहतुकीतील प्रदूषणाचा बोलबाला पाहता ईव्ही बाजारपेठ विकसित होण्याच्या शक्यतेवर फुली मारली जात होती. परंतु भारत सरकारच्या 'फेम' सारख्या योजनांच्या माध्यमातून सक्रिय रूपाने इलेक्ट्रिक घडामोडींना चालना दिली जात असून ईव्ही खरेदीसाठी अंशदान प्रदान केले जात आहे. मारुती सुझुकी आणि टाटा मोटार्ससारख्या प्रमुख भारतीय मोटार निर्मात्यांनी ईव्हीवर लक्ष केंद्रित केले आहे. अलीकडच्या काळात मारुती सुझुकीने ईव्ही एक्स आणि टाटाने नेक्सॉन ईव्ही सारखे नवीन मॉडेल बाजारात आणले. अर्थात भारताच्या ईव्ही महत्त्वाकांक्षांना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. उच्च कोटीचा खर्च स्वीकारणे हा एक मोठा अडथळा आहे. विशेषत: भारतीय बाजारपेठेवर वरचष्मा दाखवविणा–या दुचाकी ईव्हीसाठी. शिवाय सक्षम चार्जिंग व्यवस्थेचा अभाव. प्रामुख्याने टीयर–२ आणि टीयर–३ शहरात. त्यामुळे खरेदीदारांच्या मनात चिंता निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशी आव्हाने असतानाही विश्लेषक भारताच्या ईव्हीवरून आशावादी आहेत. आगामी काळात बाजारात तेजी येण्याची आशा बाळगून आहेत. २०२५ पर्यंत सहा टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात ईव्हीचा बाजारात हिस्सा वाढेल, अशी अपेक्षा आहे. विकसित होणारा उद्योग अनेक कारणांवर अवलंबून आहे. यामध्ये अंशदान आणि पायाभूत सुविधांच्या विकासाच्या माध्यमातून सरकारचे पाठबळ महत्त्वाचे ठरेल. शिवाय परकी गुंतवणूक आणि तंत्रज्ञान सहकार्य यास आकर्षित करणे, प्रामुख्याने बॅटरी निर्मितीच्या दृष्टीने कार्य करताना देशांतर्गत ईव्हीसाठी सक्षम व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. सर्वांत मोठा अडथळा अन्य सेगमेंटमधील गाड्यांच्या किमतीचा आहे.सरकारी अंशदान असतानाही ईव्ही गॅसोलिन आणि अन्य समकक्ष वाहनांच्या तुलनेत महाग आहे. विशेषत: दुचाकी वाहनांसाठी हे कटूसत्य आहे. जोपर्यंत बॅटरीवरचा खर्च कमी होत नाही आणि ईव्ही गाड्यांची किंमत पारंपरिक वाहनाच्या मूल्यांएवढी होत नाही, तोपर्यंत त्याचे व्यापक रूप पाहणे हे आव्हानात्मक राहू शकते. आणखी एक प्रमुख चिंता म्हणजे सक्षम चार्जिंगच्या पायाभूत रचनेचा अभाव. विशेषत: शहराबाहेर. परिणामी ही स्थिती खरेदीदारांना एक पाऊल मागे घेण्यास प्रवृत्त करते. चार्जिंग स्थानकापर्यंत पोचेपर्यंत वीज संपण्याची ज्यांना भीती असते,



अशी मंडळी ईव्ही खरेदीबाबत पुनर्विचार करते. या स्थितीत बदल करण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागात चार्जिंग स्टेशन स्थापन करण्याचा वेग वाढवावा लागेल. खासगी आणि सार्वजनिक भागिदारीत प्रोत्साहन देणे आणि बॅटरी स्वॅपिंग तंत्रज्ञानासारखा नवीन तोडगा शोधून काढणे यासारख्याही गोष्टींचा समावेश करता येईल.

# लातूररात महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचाराचा विराट ऐतिहासीक सभेत शुभारंभ देशात फसवणूक आणि एकअधिकारशहीच्या विरोधात परीवर्तनाची लाट





















लातूर प्रतिनिधी : राज्यातील आणि देशातील जनतेला फोडाफोडीचे राजकारण आवडलेले नाही.सातत्याने होणारी फसवणूक आणि एकाधिकारशाही विरोधात जनतेच्या मनात प्रचंडराग आहे. त्यामुळे संपूर्ण देशात परीवर्तनाची लाट निर्माण झाली आहे.
लातूर लोकसभा मतदार संघातील डॉ. शिवाजी काळगे यांच्या नामनिर्देशन दाखल करण्याच्या मिरवणूकीला आणि प्रचार शुभारंभ सभेला मिळालेला उस्फुर्त प्रतिसाद हे त्याचेच धोतक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानसभेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. लातूर लोकसभा मतदारसंघातील व महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी शुक्रवारी लातूरात लक्षवेधी विशाल मिरवणूक काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क (टाऊन हॉल) मैदानावर त्यांच्या प्रचाराची शुभारंभ सभा झाली. सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख पार पडलेल्या या ऐतिहासीक सभेत बाळासाहेब थोरात बोलत होते. या सभेस काँग्रेस पक्षाचे नेते खासदार चंद्रकात हंडोरे, वैशालीताई विलासराव देशमुख, आमदार धिरज विलासराव देशमुख शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे, साहित्सरत्न अण्णा भाऊ साठे यांचे पणतू सचिन साठे, उमेदवार डॉ.शिवाजी काळगे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार, माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार रोहीदास चव्हाण, माजी आमदार हणमंत पाटील बेटमोगरे, प्रा.यशपाल भिंगे, लोहा – कंधार आशाताई शामसुंदर शिंदे यांच्यासह व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते. विलासराजींच्या कार्याला शोभेल असे मताधिक्य दया या मिरवणूकीला आणि सभेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता लातूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी काँग्रेस उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांचा विजय निश्चीत झाल्याचे दिसून येत आहे. डॉ. काळगे यांचा हा विजय आदरणीय विलासराव देशमुख यांनी या परीसरात केलेल्या विकास कार्याला शोभणारा होइल. यादृष्टीने मताधिक्याचा विक्रम करावा असे आवाहन बाळासाहेब थोरात यांनी यावेळी केले. दहा वर्षात निष्क्रीय राहून जनतेची निराशा करणाऱ्यान सत्ताधाऱ्यांना बदलण्याची आता गरज माजी मंत्री दिलीपराव देशमुखदहा वर्षात निष्क्रीय राहून जनतेची निराशा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना बदलण्याची आता गरज निर्माण झाली आहे. या बदलाची सुरूवात लातूर पासून करावी असे आवाहन या सभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना माजी मंत्रीदिलीपराव देशमुख यांनी यावेळी केले. सन २०१४ ला दिशाभुल करणारी सत्ताधाऱ्यांनी सन २०१९ मध्ये नवीन आश्वासने देऊन पून्हा एकदा फसवले आता पून्हा जनता फसणार नाही हे आता स्पष्ट झाले आहे. त्याचाच परिणाम आजच्या सभेला मिळालेल्या उस्फूर्त प्रतिसादातून दिसून आले आहे. साधनसुचीतेच्या गप्पा मारणारे शेतकरी, महिला, युवक या सर्वांचा भ्रमनिरास केला आहे. भृष्टाचाऱ्याला संरक्षण दिले हे आता स्पष्ट झाले आहे. या परिस्थितीत सत्ताधारी बदलणे हाच पर्याय राहीला आहे. या बदलाची सुरूवात लातूर पासून व्हायला हवी असेही माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी म्हटले आहे.
लातूर लोकसभा मतदार संघात काँग्रेस महाविकास आघाडीच्या प्रचाराची एक फेरी पूर्ण झाली आहे. वातावरण चांगले बनले आहे असे समजून कार्यकर्त्यांनी मात्र स्वस्थ बसू नये, प्रत्येक बुथवरून १०० मताचे मताधिक्य मिळविण्यासाठी महाविकास आघाडीच्या पदाधिकारी यांनी काम केल्यास डॉ. शिवाजी काळगे यांचा २ लाखापेक्षा अधिकच्या मतांनी विजय होईल असेही माजी मंत्री देशमुख यांनी म्हटले आहे.

सातत्याने फसवणूक करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना
जनता मतदानातून उत्तर देईल
अमित विलासराव देशमुख

सत्ताधारी मंडळींनीकडून सातत्यांने जनतेची फसवणूक होत आहे हे स्पष्ट झाले आहे. लोकसभेची ही निवडणूक या फसवणूकीला स्पष्ट उत्तर देण्याची नामी संधी आहे. ७ मे रोजी होणाऱ्या मतदानातून सत्ताधाऱ्यांना धडा शिकवावा असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी बोलतांना केले.
या सभेत आमदार अमित देशमुख यांनी अत्यंत उस्फुर्त भाषण केले. मागच्या निवडणूकीत ज्यांना लातूरकरांनी निवडूण दिले त्यांना पाच वर्षात भाषण कसे करावे हेही शिकता आले नाही, लातूरचा एकही प्रश्न संसदेत मांडला नाही, त्यांना पून्हा संधी देणे कदापीही योग्य ठरणार नाही. या लातूरने आजवर आदरणीय भाई उध्दवराव पाटील, आदरणीय केशवराव सोनवणे, आदरणीय शिवराजजी पाटील चाकूरकर, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर, आदरणीय विलासराव देशमुख, आदरणीय दिलीपराव देशमुख यांच्या सारखे नेतृत्व राज्यासाठी आणि देशासाठी दिले आहे. ही परंपरा पुढे चालवण्यासाठी रूग्णसेवाच इश्वर सेवा समजून कार्य करणारे सुशिक्षीत सुसंस्कृत असलेले डॉ. शिवाजी काळगे यांना मोठया मताधिक्यांने विजयी करावे असे आवाहन आमदार देशमुख यांनी केले.
काँग्रेस पक्षाचे नेते राहूल गांधी आणि राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जून खर्गे यांनी या निवडणूकीच्या निमित्ताने ५ न्याय गॅररंटीचे आश्वासन दिले आहे. काँग्रेस पक्षाकडून निवडणूकीत जे आश्वासने दिले जातात त्यांची अमंलबाजवणी निश्चीत होते हे आजवर दिसून आहे आहे त्यामूळे या गॅरंटीवर विश्वास ठेऊन जनतेने डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करावे असे आवाहन आमदार देशमुख यांनी केले आहे. डॉ. शिवाजी काळगे यांची नामनिर्देशन मिरवणूक आणि प्रचार शुभारंभ सभा सक्रिय राहून यशस्वी ठरवल्या बददल आघाडीतील सर्व घटक पक्षाचे तसेच जनतेचे त्यांनी आभार मानले.

उमेदवारी कोणाला मिळाली हे न पाहता
संवीधानाच्या रंक्षणासाठी बदल घडवा
खासदार चंद्रकांत हंडोरे

अबकी बार ४०० पार असा नारा देऊन भाजपा देशाचे संविधान बदलण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे देशाची लोकशाही आणि ७५ वर्षापासून देशाला प्रगतीपथावर नेणारे राज्यघटनेचे संरक्षण करण्यासाठी या लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडी काँग्रेस उमेदवाराच्या पाठीशी जनतेने शक्ती उभी करावी, असे आवाहन खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी केले आहे.
उमेदवारी कोणाला मिळाली यापेक्षा देशाचे संविधान वाचवायचे, देशाची लोकशाही टीकवायची हा विचार करून महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करण्यासाठी जीवाचे रान करावे असेही खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी म्हटले आहे.
आदरणीय विलासराव देशमुख मुख्यमंत्री असतांना मला सामाजिक न्यायमंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली. त्याच्याच कार्यकाळात राज्यात ठिकठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर न्याय भवनची उभारणी झाली. मागासवर्गीय विदयार्थ्यासाठी राज्यभरात जिल्हा आणि तालुका पातळीवर हजार विदयार्थी क्षमतेची वसतीगृह उभारली गेली. ही वसतीगृह कोरोना काळात रूग्णांच्या सेवेसाठी उपयोगाला आली. याकामाची जाणीव ठेऊन मतदारांनी काँग्रेस महाविकास आघाडी उमेदवाराला विजयी करावे असे आवाहन चंद्रकांत हंडोरे यांनी केले आहे.

मनुस्मृती आणण्याचे मनसुबे उधळण्यासाठी
महाविकास आघाडीच्या पाठीशी शक्ती उभी करा
सुषमा अंधारे

भृष्टाचाऱ्यांना संरक्षण देणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी संविधान बदलून मनुस्मृती आणण्याचे मनसुबे उधळण्यासाठी या लोकसभा निवडणूकीत काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना जनतेने निवडूण दयावे असे आवाहन उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या सुषमा अंधारे यांनी या सभेत बोलतांना केले. समतेचा विचार सांगणारा मतात फूट पाडण्यासाठी दिशाभूल करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून दया असे आवाहनही त्यांनी केले.

पुन्हा गुलामगीरीत जायचे नसेल
तर महाविकास आघाडीला ताकद दया
सचिन साठे

माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणाऱ्या संविधानाचे रंक्षण करून काँग्रेस पक्षाने देशाला प्रगतीच्या मार्गावर नेले हे संविधान बदलून मागास जनतेला पून्हा गुलामीत ढकलण्याचे षंडयंत्र सत्ताधाऱ्याकडून रचले जात आहे, मे षडयंत्र हानून पाडण्यासाठी सुजाण जनतेने लातूर लोकसभा मतदारसंघात डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करावे असे आवाहन साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे पणतू सचिन साठे यांनी यावेळी बोलतांना केले.

भाजपने मागील १० वर्षांत लोकांची
केवळ निराशा करण्याचं काम केले
आमदार धीरज विलासराव देशमुख

आमदार धीरज विलासराव देशमुख प्रास्ताविक करताना म्हणाले की, काँग्रेस महाविकास आघाडीची प्रचार शुभारंभाची रॅली विरोधकांना धडकी भरवणारी आहे. आता लोकांनी ठरवलंय एकच फॅक्टर काळगे डॉक्टर, डॉ. काळगे यांना दिल्लीत पाठवायच ठरलेय. ही निवडणूक लोकशाहीची आहे विचाराची निवडणूक आहे. तो लोकशाहीला विचार टिकवण्यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे. या निवडणूकीत विरोधकांकडे लोकांचे मुद्दे नाहीत. त्यांचे एकच काम आहे. पक्ष आणि पक्षाची माणसे फोडण्याचे काम करीत आहेत. पण जनता जनार्दनला ते फोडो शकत नाहीत. काँग्रेस सोबत राष्ट्रवादी शिवसेना आप शेकाप कम्युनिस्ट आदी पक्ष व संघटना सोबत आहे. जनतेने ही निवडणूक हातात घेतली आहे. येणाऱ्या ७ तारखेला डॉ. काळगे यांना विजयी करण्याचे काम ही लोकशक्ती करणार आहे, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, भाजपने दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही. भाजप शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार होते, महिलांना सुरक्षा देणार होते, बेघरांना घर देणार होते, तरुणांना रोजगार देणार होते, महागाई कमी करणार होते, या आश्वासनांना भुलून लोकांनी त्यांनी संधी दिली पण भाजपने मागील १० वर्षांत लोकांची केवळ निराशा करण्याचं काम केले आहे.

# अहमदपूर मतदारसंघातून आम्ही ६९ हजारापेक्षा अधिकचे मताधिक्य देऊ

लातूर जिल्ह्यात भाजपची अवस्था बिकट आहे,
माजी मंत्री विनायकराव पाटील



माजी मंत्री विनायकराव पाटील म्हणाले की, ही निवडणूक जनतेने स्वतःच्या हातात घेतली आहे. आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे निवडून येणार आहेत. या निवडणूकीत अहमदपूर मतदारसंघातून आम्ही ६९ हजारापेक्षा अधिकचे मताधिक्य देऊ. लातूर जिल्ह्यात भाजपची अवस्था बिकट आहे, विद्यमान भाजप खासदाराने आजी आमदाराला, माजी आमदार केले. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार आहे, असे समजून काम करावे, भाजपला जिल्ह्यातील कोणत्याही गावात लोक येऊ देत नाही, त्यांनी जिल्ह्यात शेतकऱ्याला पीक विम्याची पैसे मिळू दिले नाहीत, टेंडर काढून जिल्ह्यात भाजप नेते कमिशन खातात, असे सांगून लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे. असे आवाहन त्यांनी केले.
या सभेत प्रा.यशपाल भिंगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे स्टार प्रचारक यशवंत गोसावी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार, आशा श्यामसुंदर शिंदे यांनी भाषणे केली.
यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, राज्य संघटक एकनाथ पवार, पप्पू कुलकर्णी, शेतकरी कामगार पक्षाचे उदय गवारे, अभय साळुंखे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जगदीश बावणे, डॉ.अशोक पोद्दार, संतोष देशमुख, विजय देशमुख, अजित माने, हमीद शेख, रवींद्र काळे, अशोक गोविंदपुरकर, विकास कांबळे, रविशंकर जाधव, गणेश एसआर देशमुख, माजी महापौर स्मिता खानापुरे, अमर खानापुरे, यशवंतराव पाटील, मोईज शेख, सपना किसवे, एकनाथ पाटील, लक्ष्मण कांबळे, सुनीता आरळीकर, सिराज जहागीरदार, विष्णूपंत साठे, सादिक सय्यद, राम स्वामी, एडवोकेट श्रद्धा जवळगेकर, प्रताप भोसले, बेंजामिन दुत्ते, मारुती पांडे, मनीषा कोकणे आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते, व्यापारी, व्यावसायिक, महिला, मजूर हजारोंच्या संख्येने होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश नवगिरे, सचिन सूर्यवंशी, गोविंद केंद्रे यांनी केले तर शेवटी आभार लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव यांनी मानले.

महापुरूषांना अभिवादन

महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे उमेदवारी अर्ज दाखल करून मान्यवर नेत्यासह भव्यदीव्य मिरवणुकीने व्यासपीठावर दाखल झाले नंतर या ठिकाणी समतेचा, एकात्मतेचा संदेश देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, साहित्यररत्न अण्णा भाऊ साठे यांच्या अर्धपुतळयांना अभिवादन केले. व्यासपीठावरील महापुरूषांची मांडणी आणि त्यांना अभिवादन करण्याचा या एकूण सभेचे वैशिष्ट्ये ठरले.

काँग्रेसच्या न्याय गॅरटीचे प्रतिनीधीत्व करणाऱ्या
व्यक्तीच्या हस्ते श्रीफळ वाढवून निवडणूक प्रचाराचा शुभारंभ

काँग्रेस पक्षाने या निवडणूकीत देशातील जनतेला पाच न्यायाची गॅरटी दिली आहे. या पाच न्यायाची गॅरटीचे प्रतिनीधीत्व करणाऱ्या शेतकरी तुळशीराम भोसले, सुशिक्षीत युवक कृष्णा कदम, गरीब कुटूंबातील महीला उषा राठोड, मजूर सयानंद गायकवाड आणि मागास समाजातील व्यक्ती धनराज कांबळे यांच्या हस्ते आज व्यासपीठावर श्रीफळ वाढवून डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

व्यक्तीच्या हस्ते श्रीफळ वाढवून निवडणूक प्रचाराचा शुभारंभ

समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याची भूमिका घेऊन समतेच्या विचाराने एकत्रित आलेल्या डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचार शुभारंभ सभेच्या व्यासपीठावरील महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाच्या नेत्यांना भव्य अशा पुष्पहाराने एकत्रित गुफण्यात आले. महाविकास आघाडीतील आम्ही सर्वजण एक आहोत जिददीने लढणार आहोत हे सांगणारे चित्र प्रचार यंत्रणेतील कार्यकर्त्याचा उत्साह वाढविणारे होते.

सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख
यांच्याकडून डॉ. शिवाजी काळगे यांना संवीधान भेट

या प्रचार शुभारंभ सभा प्रसंगी प्रारंभी सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना संवीधान भेट देण्यात आली.

# जगाचा पोशिंदा निवडणुकीच्या धामधुमीत दिसतोय निराश शेतकरी सापडला आर्थिक संकटात? कर्ज कसे फेडावे, याचीच चिंता



किनवट.ता.प्रतिनिधी.(शेख शौकत) जगाचा पोशिंदा शेतकरी सध्याच्या निवडणुकीच्या धामधुमीत फारसा समाधानी दिसत नाही. हंगामानुसार शेतमालाला भाव मिळत नसून पडलेल्या शेतमालाच्या भावामुळे सावकाराचे कर्ज कसे फेडावे ही चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. या परिस्थितीने घरात मंगल कार्य करण्याचे मनसुबे पार धुळीस मिळत आहे. एकंदरीत शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस खूपच बिकट झाली आहे. किनवट तालुक्यातील शेती ही कोरडवाहू असून, ओलिताखाली तसे क्षेत्र कमी आहे. कापूस हे मुख्य पीक असून, दुय्यम पीक म्हणून सोयाबीनकडे पाहिले जाते. एकतर दरवर्षी निसर्गाच्या लहरी प्रकोपाला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. अतिवृष्टी, अवर्षण हे नित्याचे बनले आहे. त्यातच घरात येणाऱ्या उत्पादित मालाला हमीभाव मिळत नाही. कापूस घरात येतो अन् सीसीआय किंवा पणन महासंघाची खरेदी होत नाही. याचा फायदा घेऊन खासगी व्यापारी सीसीआयच्या दरापेक्षा कमी दराने खरेदी करून गरजवंत शेतकऱ्यांची लूट करतो. राबराब राबूनही पोशिंदा उपेक्षितच आहे. त्यामुळे मुलाच्या शिक्षणाचा खर्च, लग्नास आलेल्या मुलीच्या लग्नाची काळजी, हातउसने म्हणून घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, वर्षाचा खर्च, शेती व्यवसायावर गंतलेला पैसा रात्रंदिवस चालू असलेली मेहनत, शेतीमालाचे पडलेले भाव आणि रासायनिक खतांच्या व कीटकनाशकांच्या वाढलेल्या किमती हा कळीचा मुद्दा ठरला आहे. निसर्गाच्या लहरी प्रकोपात शेतकरी भरडला जात आहे. तूर, ज्वारी या पिकांचेही तेच होत आहे. आदिवासी विकास महामंडळ वेळीच भरड धान्य खरेदी करत नाही सोयाबीनला पाहिजे तो भाव मिळत नाही. त्यामुळे गरजवंत शेतकरी सोयाबीन विकून मोकळा होतो तर काही शेतकरी घरात ढीग मारून भाव वाढतील या आशेत असतो. यावर्षी तर शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. सुरुवातीला सोयाबीनचे भाव वाढून होते, नंतर ते कोसळले. आजही कोसळनच आहेत कापूस व्यापाऱ्यांकडे गेला की वाढला भाव– कापूस या नगदी पिकाबाबत तेच झाले. हमीभाव ७ हजार २० रुपये प्रति क्विंटल असला तरी ६ हजार ७०० ते ६८०० रुपये प्रति क्विंटल भावाने विकून मोकळे व्हावे लागले. जसा शेतकऱ्यांचा कापूस खासगी व्यापा ऱ्यांच्या घशात गेला की कापसाचे भाव ८ हजारांवर गेले. त्यामुळे शासनाच्या व्यापारी धार्जिणे धोरणावर शेतकरी नाराज आहेत. म्हणूनच की काय लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत शेतकरी फारसा समाधानी नसल्याचे दिसून येत आहे. तेव्हा भावच नसतो... जेव्हा आमच्या घरात शेतमाल येतो तेव्हा खुल्या बाजारपेठेत भाव नसतो. जसा घरातून माल व्यापाऱ्यांना विक्री होतो तोच भाव वाढतात. चना ५ हजार ३०० रुपये प्रति क्विंटल विकला की भाव गेले ६ हजार रुपयांवर, कापूस, सोयाबीनचेही तेच झाले. जागो जागी अशी चर्चा शेतकरी करत असल्याने दिसत आहे.

# आपला माणूस आपला लोकप्रतिनिधी असावा आपल्या समस्या सोडवण्यासाठी डॉ. शिवाजी काळगे यांना दिल्लीत पाठवावे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख



लातुर प्रतिनिधी : – लोकसभा निवडणूक लातुर लोकसभा मतदार संघाची असली तरी उमेदवार निलंगा येथील आहेत आपला माणूस आपला लोकप्रतिनिधी असावा असे वाटत असेल जे आपल्या समस्या सोडवण्यासाठी सतत कार्यरत राहतील. लातूरचा सर्वांगिण विकास हवा असेल तर डॉ. शिवाजी काळगे यांना दिल्लीत पाठवावे लागेल, यासाठी यानिवडणुकीत आपण मी शिवाजी काळगे म्हणून कामाला लागावे, असे म्हणत येणाऱ्या काळात आपले जे प्रश्न असतील ते सोडवण्यासाठी आमच्यासोबत डॉ. शिवाजी काळगे सुध्दा कटिबद्ध राहतील, अशा शब्दात राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आवाहन केले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी निलंगा दौऱ्यावर असताना निलंगा येथील दादापीर दर्ग्यास भेट दिली.यावेळी मजारे शहीदचे दर्शन घेऊन चादर अर्पण केली. दरम्यान माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि सज्jाद ए दादापिर यांनी विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, आज आपण लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आलेले आहोत. आज देशासमोर अनेक समस्या अनेक आव्हाने असून ही आव्हाने आणि समस्या आमचे आदरणीय वरिष्ठ नेते आणि महाविकास आघाडी सरकारच दुर करू शकते. या वेळी जरी निवडणूक लातुर लोकसभा मतदार संघाची असली तरी उमेदवार निलंगा येथील आहेत आणि आपला माणूस आपला लोकप्रतिनिधी असावा असे वाटत असेल जे आपल्या समस्या सोडवण्यासाठी सतत कार्यरत राहतील, लातूरचा सर्वांगिण विकास हवा असेल तर डॉ. शिवाजी काळगे यांना दिल्लीत पाठवावे लागेल, यासाठी यानिवडणुकीत आपण मी शिवाजी काळगे म्हणून कामाला लागावे, असे म्हणत येणाऱ्या काळात आपले जे प्रश्न असतील ते सोडवण्यासाठी आमच्यासोबत डॉ. शिवाजी काळगे सुध्दा कटिबद्ध राहतील, अशा शब्दात उपस्थित आश्वस्त करीत या निवडणुकीत अधिकाधिक मतदान करून घ्यावे व डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करावे असे आवाहन केले. यावेळी बोलताना सज्jाद ए दादापिर म्हणाले की, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि बाभळगावचा देशमुख परिवार आमच्या हृदयात बसलेला परिवार असून या परिवाराने प्रत्येक समाजाला सोबत घेऊन सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न कायम केले. आजदेखील ही परंपरा कायम आहे असे म्हणत आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख साहेबांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. पुढे बोलताना त्यांनी लातुर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना मताधिक्य देण्यात येईल असा शब्द दिला. यावेळी बोलताना अशोकराव पाटील निलंगेकर म्हणाले की, सद्या होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत एक उच्च शिक्षित चांगला उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीने आपल्याला दिले आहेत. मागील १० वर्षात या सरकारने केवळ फसव्या घोषणा दिल्या एकही आश्वासन पूर्ण केले नाही आणि आता जात धर्माच्या नावावर आपली दिशाभुल करीत आहेत. यामुळे आतातरी नागरीकांनी सावध भूमिका घ्यावी व या निवडणुकीच्या माध्यमातून आलेल्या संधीचे सोने करावे, लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आपण देशात इंडिया आघाडी आणि राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या पाठीशी उभे राहावे व डॉ. शिवाजी काळगे याना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना डॉ शिवाजी काळगे म्हणाले की, सद्या लातुर लोकसभा निवडणूक रणधुमाळी सुरू असून या निवडणुकीत मी महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून आपल्या समोर आहे. आपण आपली खंबीर साथ मला द्यावी व या निवडणुकीत बहुमताने निवडून द्यावे अशी विनंती केली. यावेळी बोलताना अभय साळुंके म्हणाले की, जिल्हा नियोजन समिती मधील प्राप्त निधी मधून निलंगा येथील दादापीर दर्गा परिसराचा विकास काँग्रेस पक्ष्याच्या माध्यमातून केला गेला असून आज लोकसभा निवडणुकीत आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे असून आपण निवडून द्यावे अशी विनंती केली. यावेळी त्यांच्या समवेत अशोकराव पाटील निलंगेकर, आबासाहेब पाटील, अभय साळुंके, निरीक्षक संतोष देशमुख, अजित माने, डॉ अरविंद भतांबरे, अजित नाईकवाडे, पंकज शेळके, दयानंद चोपणे, विजयकुमार पाटील यांच्यासह परिसरातील नागरीक उपस्थित होते.



कामगार एकता युनियन नेरूळ नेरूळ नाका नवी मुंबई येथे महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती जल्लोशात साजरी करण्यात आली त्यावेळी वंचित बहुजन अघाडी बेलापुर तालुका मा. उपाध्यक्ष : कल्याणराव हनवते यांनी उपस्थित राहून सर्व कामगारांना जयंती दिनाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी नेरूळ कामगार युनियन नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : कोंडीबा हिंगोले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# छ. संभाजीनगरात खैरे विरुद्ध भुमरे असा होणार सामना

छत्रपती संभाजीनगर : महाविकास आघाडीने याआधीच छत्रपती संभाजीनगरासाठी आपल्या उमेदवाराची घोषणा केली आहे. या जागेवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. खैरे यांना तिकीट मिळाल्यानंतर महायुतीकडून कोणाला संधी दिली जाणार, असे विचारले जात होते. शिवसेना–भाजप यांच्या युतीत हा मतदारसंघ नेहमी शिवसेनेकडे राहिलेला आहे.

# लक्षवेधी अतीवीशाल ऐतिहासीक मिरवणूकीने महाविकास आघाडीचे डॉ. काळगे यांचा उमेदवारी अर्ज दाखल









लातूर / प्रतिनिधी :– लातूर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आज लातूर शहरातून भव्यदीव्य लक्षवेधी अतीवीशाल ऐतिहासीक मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीने लातूर शहरात आजवरच्या सर्व मिरवणुकीचे रेकॉर्ड मोडल्याचे दिसून आले. अनेक मान्यवरांचा मिरवणुकीत सहभाग लातूर शहरातून निघालेल्या या मिरवणुकीत महाविकास आघाडीचे काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख, माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, आमदार धिरज देशमुख, माजी आमदार दिनकर माने, माजी आमदार रोहीदास चव्हाण, आशाताई शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर या मिरवणुकीत सहभागी झाले. गंजगोलाई येथील जगदंबा मातेची विधीवत पूजाअर्चा करून या मिरवणूकीला सुरूवात गंजगोलाई येथील जगदंबा मातेची विधीवत पूजाअर्चा करून या मिरवणूकीला सुरूवात झाली. या मिरवणूकीत लातूर लोकसभा मतदार संघातील लोहा, कंधार तालुक्यातील अतीदुर्गम भागापासून अहमदपूर, चाकूर, उदगीर, निलंगा,शिरूरअनंतपाळ, औसा, रेणापूर, देवणी, जळकोट या सर्वच तालुक्यातून डॉ. काळगे यांना पाठींबा देण्यासाठी या मिरवणूकीत सहभागी झाले होते. विविध जातीधर्माचे लोक पारंपरीक वेशात मिरवणुकीत सहभागी सामाजीक न्यायाची भुमिका घेऊन निवडणूक लढवत असलेले लातूर लोकसभा मतदार संघातील उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी पाठीबा देण्यासाठी विविध जातीधर्माचे लोक पारंपरीक वेशात या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

यामध्ये बंजारा समाजाच्या महीला यांचे पारंपरीक नृत्य, हालगी पथक, पोतराज संबळ, धनगर समाजाचे ढोलताशे वासुदेव, वारकरी यांनी लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले. विविधतेतून एकतेचे दर्शन घडविणारे चित्र डॉ. काळगे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निघालेल्या या मिरवणूकीत काँग्रेस, राट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनीष्ठ पक्ष, आम आदमी, समाजवादी या व सर्व घटक पक्षाचे कार्यकर्ते पक्षाचे झेडे घेऊन सहभागी झाले. त्यामुळे विविधतेतून एकतेचे दर्शन घडविणारे चित्र लातूरमध्ये दिसून येत होते. महापुरूषांच्या पुतळयास अभिवादन महाविकास आघाडी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मिरवणूक गंजगोलाई येथून निघाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर येथ पर्यंत असलेल्या महापुरूषाच्या पुतळयांना डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री आमदार अमित देशमुख व मान्यवर नेत्यांनी पुषपहार अर्पन करून अभिवादन केले. महात्मा गांधी चौकात महात्मा गांधी, महात्मा ज्योतीबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आधुनीक महाराट्राचे शिल्पकार माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. मिरवणुकीवर ठिकठीकाणी पुष्पवृष्टी महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गंजगोलाई येथे जगदंबा मातेचे दर्शन घेऊन ऐतिहासीक मिरवणुकीने निघाले तेव्हा मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणी त्यांच्या रथावर नागरीक, व्यापारी, विविध संघटनाचे प्रतिनिधी पुष्ववृष्टी करून त्यांना शुभेच्छा देण्यात येत होत्या. मिरवणुकीत सहभागी झालेल्या लोकांची संख्या वरचेवर वाढत गेल्याने एकूण मिरवणुकीतील उत्साह वाढतच गेला. लोकसभा निवडणुकीचा अर्ज दाखल करण्यापूर्वी बाभळगाव येथे लोकप्रिय नेते, माजी पालकमंत्री अमित विलासराव देशमुख साहेब, आमदार धिरज देशमुख, काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या समाधीस्थळी विनम्रपणे पुष्पांजली अर्पण केली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE